# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८/ आषाढ २६, १९४० (शके)

११७ महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी, सकाळी ११.३० वाजता **अवर सचिव,श्री. उमेश शिंदे, यांच्या कक्ष क्रमांक १६, विधान भवन, नागपूर येथील दालनात** संगणकीय आज्ञावलीव्दारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहू ठराव शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१८ रोजी खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत:-

| | |
|---|---|
| **(शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित अशासकीय ठराव) —** | |
| (१) | **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर) —** |
| | "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| **(मंगळवार दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —** | |
| (२) | **श्री.जनार्दन चांदूरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६ —** |
| | "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| (३) | **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १११ —** |
| | "महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय वेगवेळया क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, नाटय व वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित करण्यात येतात, परंतु या विद्यार्थ्यांना जिल्हयाजवळच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, त्यांची गैरसोय टाळण्याकरिता प्रत्येक जिल्हयात शासनातर्फे विद्यार्थी भवनाची उभारणी करुन त्याची योग्य ती देखभाल करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| (४) | **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११८ —** |
| | "राज्यात विशेषत: ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा |

| | |
|---|---|
| | फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्हयांतील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| **(५)** | **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २० —** |
| | "पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झालेली आहे, त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळी उपाययोजना करण्याची आवश्यकता, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतू याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नाही, महाराष्ट्रातील सर्व शासकिय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता आहे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासकीय आस्थापनांना निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात तसेच (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे तपासूनच बांधकाम परवाना द्यावा अशा सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाने निर्गमित कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |
| **(६)** | **ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९१ —** |
| | "राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढींवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." |

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १७ जुलै, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती व मा. उप सभापती, विधानपरिषद यांचे सचिव तथा खाजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, शिबीर कार्यालय, नागपूर.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)
८) एम.के.सी.एल.कक्ष.